# दि.१३.०२.२०१९ रोजीच्या DBT Live Streaming प्रशिक्षण कार्यक्रम प्रश्नोत्तरे सदरा दरम्यान विचारण्यात आलेले FAQ & Answers

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १ | कोणत्या शेतकऱ्याने कशाचा अर्ज केला आहे हे कसे तपासावे ? | DPIU व SPIU स्तरावरील अधिकाऱ्यांना त्यांच्या Profile मध्ये Appication Report - Applications Details वर सदरचा अर्जदारांचा तपशिल पाहता येणार आहे. |
| २ | चुकून समूह सहायकां कडून शेतकऱ्याचा अर्ज रिजेक्ट झाल्यास शेतकरी पुन्हा अर्ज करू शकतो का ? | शेतकऱ्याचा अर्ज चुकून रिजेक्ट झाल्यास अश्या शेतकऱ्यांचा पुन्हा अर्ज नोंदवून सदर शेतकरी पुन्हा अर्ज करू शकतो. |
| ३ | नविन समूह सहाय्यक, कृषि सहाय्यक व प्रकल्प सहाय्यक यांचे id व password उपलब्ध नाहीत ? | नविन समूह सहाय्यक यांना T & M Services मार्फत id व password उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. (संपर्कासाठी गिरजेश ९६१९६६६७०६) प्रकल्प सहाय्यक व कृषि सहाय्यक यांना http://team.mahapocra.gov.in/ या लिंक मधून करावयाचे आहेत.(संपर्कासाठी संबंधित जिल्ह्याचे प्रकल्प विशेषज्ञ मनुष्यबळ विकास) |
| ४ | इच्छुक अर्जदाराने/ शेतकऱ्याने एकापेक्षा जास्त घटकांसाठी अर्ज केल्यास कृषि सहाय्यक त्यांचे Verify एकाच वेळी करू शकतो का ? | होय, कृषि सहाय्यक त्यांचे Profile Login करून ज्या अर्जदाराने/ शेतकऱ्याने एकापेक्षा जास्त घटकांसाठी अर्ज केले आहेत त्या सर्व घटकांचे एकाच Field Visit दरम्यान Verification करून Update करू शकतो. |
| ५ | या सर्व प्रक्रियेमध्ये लाभार्थ्याचे account Details कुठेच मागितलेला नाही. तर आधारशी link असलेल्या account वरच पैसे जमा होतील का.? कृपया मार्गदर्शन करावे. | पात्र शेतकऱ्यास/ लाभार्थ्यास DBT प्रणाली द्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्यासाठी आधार link असलेल्याच account वर पैसे जमा होतील.<br>**टीप**- सदर पात्र लाभार्थी/ शेतकऱ्याचे बँक खाते हे त्याच्या आधारशी Linked असणे अनिवार्य आहे. |
| ६ | स्प्रिंकलर, इलेक्ट्रिक मोटर, पाईप्स, हे portable devices त्यामुळे त्यांच्या जागा सतत बदलत असतात अशा वेळी आहेत त्यांचे Geo-Tagging करतांना कसे करावे ? | स्प्रिंकलर, इलेक्ट्रिक मोटर, पाईप्स, जरी portable devices असले तरी त्यांचे Geo-Tagging करतांना त्यांचा जास्तीत जास्त प्रत्यक्ष वापर (शेतावरील ठिकाण) होतो अशा ठिकाणाचे Geo-Tagging करावे. |
| ७ | ज्या अर्जदार/ शेतकऱ्यांचे Online नोंदणीच्या वेळी गावाचे नाव चुकले आहे त्यांनी अचूक Update कसे करावे ? | अर्जदार/ शेतकऱ्यांनी पुन्हा Login करून गावाचे नाव अचूक टाकण्यासाठी edit या विकल्पाचा वापर करावा. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| ८ | काही शेतकऱ्यांच गाव प्रल्कपात आहे पण त्यांची शेती दुसऱ्या शिवारात आहे आणि ते शिवार प्रल्कपात नाही असे शेतकरी लाभ घेण्यास पात्र आहेत का ? | इच्छुक लाभार्थ्याची भूधारणा ही पोकरा प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या गावांमध्येच असणे अनिवार्य आहे. |
| ९ | अर्जदार शेतकऱ्याकडे एकाच गावामध्ये दोन सर्व्हे नं असतील तर त्या दोन्ही सर्व्हे नं वर लाभ घेता येईल का ? | ज्या शेतकऱ्याकडे प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या गावामधील दोन सर्व्हे नं असतील पण एकूण सर्व्हे नं वरील भुधारणा ही २ हेक्टर च्या आत आहे असा लाभार्थी पात्र ठरू शकतो. या परिस्थितीत दोन किंवा दोनापेक्षा जास्त सर्व्हे नं करिता इच्छुक शेतकऱ्याचा आधार Login करून Land Details मध्ये दोन ७/१२ Upload करावे. |
| १० | पात्र लाभार्थ्याचे अनुज्ञेय अर्थसहाय्य हे कोणाच्या बँक खात्यातून वजा होईल ? PMU / SDAO ? | पात्र लाभार्थ्याचे अनुज्ञेय अर्थसहाय्य हे प्रकल्प व्यवस्थापन कक्षाकडून PMU होणार आहे. |
| ११ | शेळीपालन कुकूटपालन या घटकांचा लाभ विधवा महिला यांची नोंदणी करते वेळी त्यांचे विधवा प्रमाणपत्र अपलोड कसे करावे ? | शेळीपालन कुकूटपालन या घटकांचा लाभ विधवा महिला यांची नोंदणी करते वेळी त्यांचे विधवा प्रमाणपत्र अपलोड करण्यासाठी Basic Details च्या Tab वर दिले आहे. |
| १२ | काही लाभार्थ्याचे ऑनलाइन करतेवेळेस बोटांचे ठसे येत नसल्यामुळे त्या शेतकऱ्याची Login होत नाही व मोबाईल नंबर लिंक नाही. असे शेतकऱ्यांनी Online अर्ज कसा करायचा ? | बायो मेट्रिक मशिनवर बोटांचे ठसे येत नसल्यास इच्छुक लाभार्थ्याने आधार संबंधित नागरी सेवा केंद्रांचे (CSC) सहाय्य घ्यावे. किंवा नवीन मोबाईल आधार Linked करण्यासाठी देखील नागरी सेवा केंद्रांमार्फत Update करता येईल. |
| १३ | ८अ , ७/१२ हा ऑनलाइन अपलोड केला तर चालेल का ? | महाभूलेख वेबसाईट वरून Online Genrated ८अ , ७/१२ Upload करावा<br>**टीप :** शक्यतो ऑनलाइन Genrated ८अ , ७/१२ वर संबंधित तलाठ्याची स्वाक्षरी घेऊन Upload करावा. |
| १४ | नव्याने नियुक्त CA यांना Online Registration ची प्रक्रिया केल्यानंतरही जुन्या CA चे नाव दिसते, त्यामुळे सद्यस्थितीत Online Registration झालेल्या अर्जांची संख्या कमी दिसते ? | १) Newly appointed CA Registered by T & M २) PS- HRD have to map villeges to Profile of CA by using monitoring app. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १५ | काही अर्जदार शेतकऱ्यांनी Online Registration च्या वेळेस भूमिहीन हा विकल्प निवडला असून भूमिहीन प्रमाणपत्र Upload केले आहे, त्याबरोबरच सदर अर्जदारांनी ७/१२ व ८-अ हे देखील Upload केले आहेत असे वेळेस काय करावे ? | सदर इच्छुक लाभार्थ्यास पूर्व कल्पना देऊन अल्प भूधारक म्हणूनच गणना करावी व सदर लाभार्थ्यास भूमिहीन म्हणून प्राधान्य न देता अल्प भूधारक म्हणूनच लाभ देता येईल. |
| १६ | ७/१२ ऐवजी चुकीचा फोटो Upload झाला आहे त्याएवजी अचूक फोटो कसा Upload करावा ? | चुकीच्या ७/१२ फोटो ऐवजी अचूक फोटो Upload करण्यासाठी १) इच्छुक शेतकऱ्याने Login करून View & Edit मार्फत अचूक फोटो Upload करावा. २) समूह सहाय्यकाने Verification च्या वेळी Back to Beneficiary करून अचूक फोटो Upload करावा. |
| १७ | इच्छुक अर्जदार शेतकऱ्याने Online Registration कसे करावे ? | दि.१३.०२.२०१९ रोजीच्या DBT Live Streaming प्रशिक्षण कार्यक्रमाची video clip जतन करुन सर्व क्षेत्रीय कार्यालयांशी Share करण्यात येणार आहे. |
| १८ | पोकरा प्रकल्पांतर्गत आता पर्यंत जे Offline नोंदणी झालेले व ज्या अर्जांना पुर्वसंमती मिळालेली आहे असे पात्र अर्जदारांना DBT प्रणालीवर घेऊन अनुदान अदा करता येईल का ? | होय, अशा Offline अर्जांना अर्थसहाय्य अदायगीसाठी सदर पात्र लाभार्थींचे Online नोंदणी करून, VCRMC समितीने मंजुरी दिलेला ठराव, दिनांक, पूर्वसंमती व दिनांक अशी Desk-३ पर्यंतची नोंदणी मागील तारखांची राहील व त्यापुढील Desk Uploading ची कार्यवाही ही Current तारखांनुसार राहील |
| १९ | लाइट बिल अणि कास्ट सर्टिफिकेट कुठे अपलोड करायचे ? | इच्छुक शेतकऱ्याने/ लाभार्थ्याने त्याचे जात प्रमाणपत्र Online नोंदणीच्या वेळेलाच करावयाचे आहे. |
| २० | MB (मापन पुस्तिका ) रेकॉर्ड करायचे काम कृषी सहाय्यकाचे आहे का ? | होय, MB (मापन पुस्तिका ) नोंदणी Online करायचे काम कृषी सहाय्यकांचे आहे. |
| २१ | ज्या गावामध्ये मोबाईल नेटवर्क नाही त्या गावा मध्ये काय करावे ? | कृपया अशा वेळेस मोबाईल नेटवर्क असलेल्या ठिकाणाहून सदर माहिती upload करावी. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| २२ | प्रकल्पांतर्गत कुक्कुटपालन व बंदिस्त शेळीपालन घटकाचा लाभ घेण्यासाठी कोंबडया व शेळ्यांची खरेदी कशी करावी ? सदर घटकासाठी अर्थसहाय्य कसे अदा करण्यात येईल ? | कुक्कुट पालन व बंदिस्त शेळीपालन या घटकांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शक सूचनांमध्ये दिलेल्या खरेदी समितीच्या समक्ष व परवानगीने सुलभ पुरवठादाराकडून लाभार्थ्याने स्वखर्चाने खरेदी करून सदरच्या खरेदी बाबतची मूळ देयके घ्यावयाची आहेत. तदनंतर सदर देयके व खरेदी समितीचे प्रमाणपत्र Online सादर करावयाची आहेत. |
| २३ | प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी / नोंदणीकृत गट यांना लाभ देतांना त्यांच्या निवडीचे निकष काय आहेत ? | प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या व्यवसाय आराखड्यांना वित्तीय संस्थांचे अर्थसहाय्य घटकाच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये नमूद इच्छुक FPO ही प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या/शेतकरी उत्पादक संघ असावी व शेतकरी/ महिला /भुमिहिन व्यक्तींचे इच्छुक गट हे प्रकल्पासाठी निवड झालेल्या गावातील कोणत्याही यंत्रणेकडे नोंदणी झालेले असावेत. |
| २४ | Registration offline घेता येतील अशी व्यवस्था होईल का ? | Registration फक्त online करावयाचे आहेत. |
| २५ | DBT मार्फत Payment आपल्या स्तरावरून होत असल्यामुळे sdao स्तरावर cash book ठेवावे लागेल का ? | DBT प्रणाली मार्फत लाभार्थ्यास Payment होत असल्यामुळे sdao स्तरावर अर्थसहाय्यासाठी वेगळे cash book ठेवायची गरज नाही. |
| २६ | DBT app साठी गावात network ची गरज आहे का ? | DBT प्रणाली गावस्तरावर हाताळण्यासाठी network ची गरज अनिवार्य आहे. |
| २७ | जर समजा शेत वडिलच्या नावे असेल तर मुलाला भूमीहीन म्हणून लाभ घेता येइल का ? | इच्छुक लाभार्थ्याने भूमिहीन म्हणून घटकांचा लाभ घेताना त्याचेकडे भूमिहीन असल्याचे प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. |
| २८ | SDAO स्तरावरून DBT प्रणाली द्वारे अर्थसहाय्य अदायगी ची Cash Book मध्ये घ्यावी का ? | DBT प्रणाली द्वारे लाभार्थ्यास अर्थसहाय्य होत असल्यामुळे त्याचे वेगळे cash book मध्ये क्षेत्रीयस्तरावर नोंद ठेवली जाणार नाही DBT प्रणाली द्वारे लाभार्थ्यास होणाऱ्या अर्थसहाय्याचे प्रदान प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) कडून होणार आहे. |
| २९ | DBT Aap मध्ये जमीनधारक व भूमीहीन हे विकल्प आहेत तसेच जर विधवा व परितक्त्या आणि घटस्फोटित यांचे ही विकल्प करता येतील का ? | शेळीपालन कुकूटपालन या घटकांचा लाभ विधवा महिला यांची नोंदणी करते वेळी त्यांचे विधवा प्रमाणपत्र अपलोड करण्यासाठी Basic Details च्या Tab वर दिले आहे. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| ३० | भूमिहीन घटकाचा लाभ घेण्यासाठी जात प्रमाणपत्र आवश्यक आहे का ? | इच्छुक भूमिहीन शेतकऱ्याकडे जात प्रमाणपत्र असणे अनिवार्य नाही पण online Registration च्या वेळेस जात प्रमाणपत्र असल्यास Upload करावे |
| ३१ | जिल्हा स्तरावर असलेलं Verification & Approval याबद्दल मार्गदर्शन करावे | सर्व वैयक्तिक लाभासाठीच्या घटकांचे Verification व Approval हे SDAO स्तरावरून होणार असून फक्त शेतकरी उत्पादक कंपनी / नोंदणीकृत गटांसाठीचे (१० लाखापेक्षा जास्त) Verification व Approval हे संबंधित जिल्ह्याचे प्रकल्प संचालक, आत्मा स्तरावरून होणार आहे. |
| ३२ | online Registration च्या वेळेस ७/१२ व ८- अ स्कॅन करून Upload करावयाचे का ? ग्राम कृषी संजीवनी समीतीला Hard Copy द्यावी लागेल का ? | ७/१२ व ८-अ हे Scan करून Upload करावे अतिरिक्त Hard Copy ची आवश्यकता नाही. |
| ३३ | बायोमेट्रिक मशीन लॅपटॉपवर आणि कॉम्प्युटर वर चालत नाही काय करावे ? | सर्वप्रथम ज्या कंपनीचे बायोमेट्रिक मशीन Device आहे त्या कंपनीचेच RD Service Internet द्वारे ज्या लॅपटॉपवर किंवा कॉम्प्युटर वर Uploading चे काम सुरु आहे त्यावर Download करून Install करणे. तदनंतर त्या बायोमेट्रिक मशीन कंपनीच्या Custmer Care Services वर फोन करून ते बायोमेट्रिक मशीन Intigrate करून घ्यावे बायोमेट्रिक मशीन Intigrate प्रक्रिया पूर्णपणे झाल्यावरच सदर बायोमेट्रिक मशीन त्या लॅपटॉप किंवा कॉम्प्युटर वर Support करेल. |
| ३४ | एका लाभार्थीची जमीन दोन गावात आहे. दोन्ही गावे प्रकल्पात समाविष्ट आहेत. एका गावात लाभार्थीचे जमिनीचे रजिस्ट्रेशन केले असता पुन्हा दुसर्या गावात लाभार्थीचे जमिनीचे रजिस्ट्रेशन होत नाही. त्यासाठी काय करावे ? | त्यासाठी Registration Details वर Land Holding वर दुसऱ्या गावाचा ८-अ व सर्व्हे नं. Online Update करता येईल. |